# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(विशेष)**

**दिनांक २८.०९.२०२६ सोमवार**

**१) गुन्हेशाखा युनिट क्र. ४ पोलीसांची कामगीरी :— घरफोडीचा गुन्हा उघडकीस. १६,९०,२००/— रु चा मुद्येमाल हस्तगत.**

दिनांक १२.०९.२०२६ चे ११.०० वा. ते दिनांक १३.०९.२०२६ चे ०७.३५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीत, उंटखाना, प्लॉट क्र. १२९, दहीपुरा ले—आऊट, इमामवाडा, नागपूर येथे राहणारे फिर्यादी मिलींद नामदेवराव कांबळे, वय ६५ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह मुलाचे सासुरवाडी बल्लारशाहा (चंद्रपुर) येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडून, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख ७५,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने वजनी २५६.५ ग्राम व चांदीचे चाळ असा एकुण किंमती १४,१५,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे इमामवाडा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५,३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ४ पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपासादरम्यान परिसरातील ५०० हुन अधिक सीसीटिव्ही कॅमेरा फुटेजची पाहणी व तपासणी करून एका विधीसंघर्षग्रस्त बालक यास निष्पन्न केले. विधीसंघर्षग्रस्त बालक यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार एक विधीसंघर्षग्रस्त बालक याचेसह संगनमताने वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. विधीसंघर्षग्रस्त बालक याचे ताब्यातुन सोन्याचे दागिने वजनी १३६.८०० ग्राम व चांदीचे दागिने वजनी ३८. ६०० ग्राम तसेच विधीसंघर्षग्रस्त बालक याचा मोबाईल असा एकुण १६,९०,२००/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. विधीसंघर्षग्रस्त बालक यास मुद्देमालासह पुढील कारवाईकामी इमामवाडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे विधीसंघर्षग्रस्त बालक याचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. श्री बाबुराव राऊत, सपोनि वैभव बारंगे, पोउपनि जितेश आरवेल्ली, पोहवा भगवती ठाकूर, देवेंद्र नवघरे, निलेश ढोणे, पुरुषोत्तम जगनाडे, अजय यादव पोअं. गोविंद देशमुख, अभिषेक शनिवारे यांनी केली.



स्वा/–

( अंकुश राठोड )

पोलीस उप निरीक्षक,

पोलीस जनसंपर्क अधिकारी,

नागपुर शहर.